RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784

वर्ष ३ रे | अंक : १५१ वा बुधवार दि. २३ जुलै २०२५ पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

नगरविकास खात्याच्या निधीला आता मुख्यमंत्री यांची परवानगी लागेल...

वृत्तसंस्था/मुंबई

राज्यातील महायुती सरकारमध्ये अंतर्गत वाद असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात अनेकदा रंगत असते. मुख्यमंत्रिपदावर विराजमान झाल्यापासून देवेंद्र फडणवीस हे कठोर निर्णय घेत मित्रपक्षांवर अंकुश ठेवत असल्याचंही बोललं जातं. अशातच मुख्यमंत्र्यांनी नगरविकास खात्याबाबत महत्त्वाचा निर्णय घेतल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली. नगरविकास खात्यातील मोठ्या निधीवाटपासाठी यापुढे मुख्यमंत्री फडणवीस यांची परवानगी आवश्यक असेल. या निर्णयाच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांकडून उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा आहे. राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. निवडणुकीच्या तोंडावर नगरविकास खात्यातील निधी वाटपावरून वाद सुरू होण्याची शक्यता आहे. कारण, नगरविकास खात्यामार्फत शिंदेंच्या शिवसेनेला जास्त निधी मिळतो, असा आरोप आहे. तसंच निवडणुकीपूर्वी शिंदेंच्या शिवसेनेत इनकमिंग होण्याची शक्यता आहे. त्यावेळी बाहेरच्या लोकांना भरपूर निधी देण्याची शक्यता आहे. यावर मित्रपक्षांनी आक्षेप घेतला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांनी या खात्याच्या कारभारात लक्ष घालण्याचे ठरवल्याचं दिसत आहे. ग्रामविकास खाते भाजप आणि नगरविकास खाते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. नगरविकास खात्यातून आमदार आणि नगरसेवकांना विविध योजनांसाठी निधी दिला जातो. मात्र, हा निधी फक्त शिंदे गटाच्या लोकांनाच मिळतो, असा आरोप आहे. काही आमदारांनी तर मित्रपक्षांना पुरेसा निधी मिळत नसल्याची तक्रार फडणवीसांकडे केली होती. त्यामुळे आता मुख्यमंत्री कार्यालयाकडून नगरविकास खात्याचा निधी सगळ्या जिल्ह्यांमध्ये समान वाटला जातो की नाही, हे तपासले जाईल. निवडणुकीच्या वेळी शहर भागात मोठ्या प्रमाणात निधीवाटप होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा निधी तिन्ही

पक्षांमध्ये व्यवस्थित वाटला जातो की नाही, यावर फडणवीसांची नजर असणार आहे. नगरविकास खात्याच्या ज्या योजना आहेत, त्यामार्फत नगरसेवक आणि आमदारांना मोठा निधी मंजूर करायचा असेल तर एकनाथ शिंदे यांच्या स्वाक्षरीनंतर ती फाईल मुख्यमंत्र्यांकडे जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची परवानगी मिळाल्यानंतरच हा निधी वितरीत केला जाईल, असे सांगण्यात आले आहे. दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी या निर्णयाच्या माध्यमातून शिंदे यांच्यावर एक प्रकारे नियंत्रण ठेवण्यात आले आहे, अशी चर्चा सुरू आहे. त्यामुळे यावर एकनाथ शिंदे काय प्रतिक्रिया देतात, हे पाहणे महत्त्वाचे आहे.

मुख्यमंत्री इकडे वळून पाहातील काय ?

सरकारकडून मदतीचे फक्त आश्वासन; प्रत्यक्षात मात्र काहीच नाही!

पतीच्या बलिदानानंतर पत्नी स्वाती नागरेंचा अन्नत्याग आंदोलनाचा दुसरा दिवस!

जनसंचलन/ देऊळगाव राजा

राज्य शासनाचा युवा शेतकरी पुरस्कारफ्फ मिळवणारे आणि अंढेरा परिसरातील शेतीसाठी धरणातून पाणी मिळावे, या मागणीसाठी १३ मार्च २०२५ रोजी स्वतःचा बळी देणारे शेतकरी स्व. कैलास अर्जुन नागरे यांच्या पत्नी श्रीमती स्वाती नागरे यांनी अखेर संतप्त पाऊल उचलत अन्नत्याग आंदोलनास सुरुवात केली आहे. चार महिने उलटूनही शासनाने फक्त आश्वासनांची पूर्तता केली असून, प्रत्यक्षात कोणतीही ठोस मदत किंवा निर्णय झालेला नाही. त्यामुळे स्वाती नागरे यांनी आज २१ जुलै २०२५ पासून आपल्या राहत्या घरी शिवणी आरमाळ (ता. देऊळगाव राजा, जि. बुलढाणा) येथे पतीच्या प्रतिमेजवळ अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. स्वाती नागरे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केलं आहे की, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत आमच्या मुलांना दत्तक घेत पालकत्व स्वीकारल्याचे जाहीर केले होते. मुलांचे शिक्षण, आरोग्य यासाठी सरकार सर्व जबाबदाऱ्या पार पाडेल असे सांगण्यात आले. मात्र, प्रत्यक्षात आजही आम्हाला कुठलीही शासकीय मदत मिळालेली नाही. याशिवाय स्व. कैलास नागरे यांनी आपल्या शेवटच्या निवेदनात उल्लेख केलेल्या १४ गावांच्या शेतीसाठी पाणी पुरवठा करण्याचा मुद्दाही प्रलंबित असल्याचे त्यांनी सांगितले.

१२ दिवसांचा अल्टिमेटम अन्यथा आत्मबलिदान

स्वाती नागरे यांनी सरकारला १२ दिवसांची अंतिम मुदत दिली असून, या कालावधीत मुख्यमंत्री किंवा जबाबदार अधिकाऱ्यांनी भेट घेऊन ठोस निर्णय न घेतल्यास, त्या आत्मबलिदान देण्यास मागे हटणार नाहीत, असा तीव्र इशाराही दिला आहे. मी एकटी स्त्री असूनही मुलांचा सांभाळ, शेतीची जबाबदारी आणि पतीच्या बलिदानासाठी लढा देत आहे. आता निर्णय घेणाऱ्यांनी तरी जागं व्हावं! अशी भावनिक प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. या आंदोलनाला झुंझार शेतकरी मंचचा पाठिंबा असून, त्यांनी सरकारकडून तत्काळ मदत आणि मागण्या पूर्ण करण्याची मागणी केली आहे. या आंदोलनाला देऊळगाव राजा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती समाधान शिंगणे यांनी भेट घेऊन न्यायासाठी

सरकार दरबारी लढा उभारू असे सांगितले.

...डॉनचा सूत्रधार...

संपादकीय लेख

डॉन को पकड़ना मुश्किल ही नहीं, नामुमकिन है...फ हा अजरामर संवाद, ङ्गडॉनसारखा यशस्वी चित्रपट पुन्हा करणे मुश्किल ही नहीं, नामुमकिन है,फ असा थोडा बदलता येईल. या चित्रपटाचे दिग्दर्शक चंद्रा बारोट यांच्याबाबत असेच काहीसे झाले. एक प्रचंड यशस्वी, अमिताभ बच्चनला ङ्गसोलो हिरोफ म्हणून अमाप यश देणारा पहिला चित्रपट म्हणून ङ्गडॉनफ्ने इतिहास घडवला. परंतु ङ्गडॉनफ्चे सूत्रधार दिग्दर्शक चंद्रा बारोट हे नंतर ङ्गडॉनफ्च्या यशाच्या आसपासही कधी फिरकू शकले नाहीत. चंद्रा बारोट यांच्या निधनाने निधनाने हिंदी सिनेमाने एक शांत, स्वतःच्या यशाविषयीही फार न बोलणारा दिग्दर्शक गमावला. चंद्रा बारोट यांनी ज्यांच्याकडे उमेदवारी केली ते मनोज कुमार हे सामाजिक आशय असलेले व्यावसायिक चित्रपट बनविण्यात वाकबगार होते. परंतु स्वतंत्र दिग्दर्शक म्हणून पहिल्याच प्रयत्नात बारोट यांनी ङ्गडॉनफ्सारखा चित्रपट केला. सलीम-जावेदसारखे लेखक, दुहेरी भूमिकेत अमिताभ बच्चन आणि कल्याणजी-आनंदजी यांच्या संगीताने पकडलेली लोकप्रियतेची नस हे सगळे पहिल्याच चित्रपटात वाट्याला येणे हे बारोट यांचे भाग्यच होते. चंद्रा बारोट यांची पटकथेवरील पकड, दृश्यरचनेतील सौंदर्यदृष्टी या सर्व गोष्टी ङ्गडॉनफ्मध्ये ठळकपणे जाणवतात. त्या काळातले ङ्गगँगस्टरफ सिनेमे बऱ्याचदा एका साचातले असायचे. बारोट यांच्या ङ्गडॉनफ्ने

तो साचा मोडला. त्यामुळे त्या चित्रपटास एक चिरकालीन मूल्य मिळाले. मात्र, त्यानंतरचा चंद्रा बारोट यांचा सिनेप्रवास तितकासा मोठाही नव्हता आणि प्रभावीही नव्हता. जणू त्यांची जादू एकाच सिनेमात संपून गेली. ङ्गराज तिलकफ (१९८४) सारख्या ऐतिहासिक सिनेमाचे दिग्दर्शन करताना त्यांनी भव्यतेचा वेगळा पैलू उलगडला होता. त्यांचे काही प्रकल्प अपूर्णही राहिले. ते प्रसिद्धीपासून कायम दूर राहिले. कुठल्याही इंटरव्ह्यूमध्ये ते स्वतःबद्दल फार बोलत नसत. परंतु ङ्गडॉनफ मात्र त्यांच्याबद्दल कायम बोलत राहिला आहे; यापुढेही बोलत राहील.

प्रधानमंत्री पिक विमा योजना; ३१ जुलैपर्यंत सहभागी होण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यात सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना यावर्षीच्या खरीप हंगामापासून लागू करण्यात आलेली आहे. सुधारित पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचना शासनाने जारी केल्या आहेत. सुधारित पिक विमा योजनामध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी ३१ जुलै २०२५ अखेरपर्यंत सहभाग नोंदवावा. अधिक माहितीसाठी आपल्या नजिकच्या कृषी कार्यालयास संपर्क करावा, असे आवाहन कृषि उपसंचालक संजीवनी कणखर यांनी केले आहे. जिल्ह्यात सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०२५ व रब्बी २०२५-२६ हंगामकरिता (८०:११०) नुसार अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र धरून राबवण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार विमा कंपन्यांची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून भारतीय कृषी विमा कंपनीची एक वर्षासाठी निवड करण्यात आली आहे. योजनचा उद्देश : नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगामुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे, शेतकऱ्यांना नावीन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामुग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे, पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे, कृषि क्षेत्रासाठी पतपुरवठ्यात सातत्य राखणे, उत्पादनातील जोखीम पासून शेतकऱ्यांच्या संरक्षणाबरोबर अन्नसुरक्षा पिकांचे विविध कारण आणि कृषि क्षेत्राचा गतिमान विकास व स्पर्धात्मकतेत वाढ होण्यास मदत होईल. योजनेचे वैशिष्टे : सदर योजना अधिसूचित पिकांसाठी केवळ अधिसूचित क्षेत्रासाठी लागू असेल. योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे, अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी खातेदारांचे वैयक्तिक कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. मात्र भाडेपट्टीने शेती करणारास नोंदणीकृत भाडेकरार पिक विमा संकेत स्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता हा खरीप हंगामासाठी २ टक्के, रब्बी हंगामसाठी १.५० टक्के व नगदी पिकांसाठी ५ टक्के असा मर्यादित ठेवण्यात आला आहे. या योजनेंतर्गत खरीप २०५ व रब्बी २०२५-२६ हंगामकरिता १ वर्षासाठी सर्व अधिसुचित पिकांसाठी जोखीमस्तर ७० टक्के असा निश्चित करण्यात आला आहे. अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांचे उंबरठा उत्पादन हे मागील सात वर्षांपैकी सर्वाधिक उत्पादनाच्या पाच वर्षाची सरासरी उत्पादन गुणिले त्या पिकाचा जोखीमस्तर विचारात घेऊन निश्चित केले जाईल. या योजनेत मृत शेतकऱ्यांच्या नावे तसेच अवैध मार्गाने विमा काढला गेल्यास तो प्रस्ताव रद्द करण्यात येईल. योजनेमध्ये सहभागी घेण्यासाठी शेतकरी ओळखपत्र क्रमांक असणे अनिवार्य असेल. पिक विमा नुकसान भरपाईसाठी ई पिक पाहणी अंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक राहील. बोगस पीकविमा प्रकरणात फौजदारी कार्यवाही करण्यात येईल. पीकविमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी सीएससी केंद्रधारकास ४० रुपये मानधन केंद्र शासनाने निश्चित केले असून विमा कंपनीमार्फत सीएससी केंद्र धारकास दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांचा विमा हप्ता व्यतिरिक्त इतर शुल्क सीएससी केंद्रधारकास देऊ नये. योजनेअंतर्गत भात, सोयाबीन, कापूस व गहू या पिकाकरिता खरीप हंगाम २०२५ व रब्बी हंगाम २०२५-२६ करिता पिक कापणी प्रयोगाद्वारे प्राप्त उत्पादनास ५० टक्के भारांकन व अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे प्राप्त तांत्रिक उत्पादनास ५० टक्के भारांकन देऊन विमा क्षेत्र घटकातील सरासरी उत्पादकता निश्चित करण्यात येईल.

योजने अंतर्गत खरीप व रब्बी हंगामा करिता पीक पेरणी पासून काढणीपर्यंतच्या कालावधीत विविध नैसर्गिक आपत्ती किंवा पिक उत्पादनावर विपरीत परिणाम करणारे इतर बाबीमुळे हंगामाच्या शेवटी पीक कापणी प्रयोग आधारे किंवा तांत्रिक उत्पादन आधारे महसूल मंडळामध्ये पिकाच्या उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत येणारी घट गृहीत धरून नुकसान भरपाई देय राहील. पिक निहाय शेतकरी हिस्सा विमा हप्ता दर प्रति हेक्टर सोयाबीनसाठी ११६० रुपये, कपाशी ९०० रुपये, तुर ४७० रुपये, मका ९० रुपये, मुंग ७० रुपये, उडीद ६२.५०रुपये, ज्वारी ८२. ५० रुपये निश्चित केला आहे. अधिक माहितीसाठी https://pmfby.gov.in/ या वेबसाइटवर किंवा हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १४४४७ किंवा आपल्या नजीकच्या सीएससी केंद्र, कृषी विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

पश्चिम विदर्भात मुसळधार! ४ तासांच्या संततधारेने अकोला, बुलढाणा, वाशीम जिल्ह्यांत पूर; दोघांचा मृत्यू...

बुलढाणा: दडी मारून बसलेल्या पावसाने पश्चिम विदर्भातील अकोला, बुलढाणा आणि वाशीम जिल्ह्यात मंगळवारी पहाटेच्या सुमारास दमदार पुनरागमन केले. चार-पाच तास पावसाची संततधार सुरू असल्याने नदी, नाल्यांना पूर आला आहे. हजारो हेक्टरमधील पिके पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. काही गावांतील घरांची पडझड झाल्याने संसार उघड्यावर आले आहेत. अकोला जिल्ह्यात नाल्याच्या पुरात वाहून गेल्याने एकाचा तर बुलढाणा जिल्ह्यात सर्पदंश झाल्यानंतर पुरामुळे वेळेत उपचार न मिळाल्याने महिलेचा मृत्यू झाला.बुलढाणा जिल्ह्याच्या लोणार तालुक्यात मंगळवारी पहाटे चार तास बरसलेल्या दमदार पावसामुळे अतिवृष्टीची नोंद झाली आहे. या पावसामुळे नदी, नाल्यांना पूर आल्याने हजारो हेक्टरमधील उभी पिके पाण्याखाली गेली. देऊळगाव कुंडपाळ, अजिसपूर, धाड, पांग्रा डोळे, टिटवी, लोणार, हिरडव, बोरखेडी, गुंधा या भागात पिकांचे नुकसान झाले. देऊळगाव कुंडपाळजवळील तलावास मोठे भगदाड पडले असून, तो फुटण्याची शक्यता वर्तविली जात आहे. लोणार तालुक्यात अतिवृष्टीमुळे नद्या, नाले दुथडी भरून वाहू लागले. काही नद्यांच्या पुलावरून पाणी वाहत असल्याने चार मार्गांवरील गावांचा संपर्क तुटला होता.हिरडव ते लोणार, लोणार ते देऊळगाव कुंडपाळ, अजिसपूर ते खुरमपूर, वडगाव ते वडगाव फाटा या मार्गांवरील वाहतूक ठप्प झाली होती. टिटवी, देऊळगाव कुंडपाळ व गुंधा लघु पाटबंधारे प्रकल्प शंभर टक्के भरले असून सांडव्याद्वारे विसर्ग सुरू आहे. नदीकाठच्या देऊळगाव कुंडपाळ, टिटवी, रायगाव, नांद्रा, गुंजखेड, मोहोतखेड या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. ङ्कलोणार तालुक्यातील पाच व खामगाव, शेगाव तालुक्यातील दोन मंडळात ढगफुटीसदृश पाऊस झाल्यामुळे पिके, शेतजमिनी आणि घरांचे मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीचे तत्काळ पंचनामे कराफ, असे निर्देश केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.धाड येथील शेतकरी पुरात अडकल्याने जीव वाचविण्यासाठी शेतातील टीनशेडवर जावून बसले. त्यांना वाचविण्यासाठी मुलगा गेला आणि तोसुद्धा तिथेच अडकला. याबाबतची माहिती मिळताच शिवछत्र मित्र मंडळाचे अध्यक्ष नंदकिशोर मापारी यांना तहसीलदार

व पोलिसांना माहिती दिली. अखेर बचाव पथकाने विठ्ठल रामचंद्र वाघमारे व विकास विठ्ठल वाघमारे या पिता-पुत्रास सुखरूप बाहेर काढले. लोणार येथील शेख महेबुब शेख रऊफ यांच्या घराशेजारील भिंत पडल्याने त्याखाली दबून दुचाकीचे नुकसान झाले.

वाशीम जिल्ह्यातील पैनगंगा, अडाण आणि काटेपूर्णा नदीला आलेल्या पुराने पिके वाहून गेली. दुबार आणि तिबार पेरणी केलेले पीकही पुरात वाहून गेल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. पैनगंगा नदी दुथडी भरून वाहत असल्याने काठावरील गावांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. या पुरामुळे शेलू खडसे, वाकद, पिंपळगाव, अकोली, हिवरा या गावांतील शेती पाण्याखाली गेली आहे. मालेगाव तालुक्यात रात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे काटेपूर्णा नदीला पूर आला आहे. या पुराचे पाणी पुलावरून वाहत असल्याने कुत्तरडोह, अमानवाडी, रामरावाडी, पिंपळखेडा या गावांचा संपर्क तुटला होता. कुत्तरडोह गावाजवळच्या पुलाची उंची कमी असल्याने पुढील तीन ते चार दिवस पुलावरून पाणी वाहणार असल्याचे गावकरी सांगत आहे. शेलुबाजार परिसरातील अडाण नदीला पूर आल्याने शेकडो एकर शेती पाण्याखाली गेली आहे. अनेक ठिकाणी शेतातील मातीसह पिके वाहून गेलीत. पिंपरी, खरबी, मसोला, गणेशपूर या भागातील शेतीला मोठा फटका बसला आहे. जिल्ह्यात आज, बुधवारीही पावसाचा जोर कायम राहणार असून प्रशासनाकडून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.लोणार शहरात दमदार पाऊस झाल्याने काठावरून सरोवरात पाणी गेले. आधीच सरोवरातील पाण्याची पातळी वाढलेली होती. आजच्या पावसाने त्यात भर पडून चार ते पाच फूट पाणी पातळीत वाढ झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. सरोवरामधील कमळजा माता मंदिर चौथऱ्यापर्यंत पाण्याखाली गेले आहे.

हनी ट्रॅपवरुन राजकीय वार; प्रफुल्ल लोढा यांचे भाजप, मविआच्या नेत्यांसोबत फोटो व्हायरल

जळगाव : राज्यभरात ङ्कहनी ट्रॅपफ चा विषय गाजत असून, त्यातच आता जळगाव जिल्ह्यातल्या जामनेर तालुक्यातील प्रफुल्ल लोढा याच्यावर महनी ट्रॅपफ्चा गुन्हा दाखल झाल्याने खळबळ उडाली आहे. लोढाची जवळीक नेमकी कुणाशी, यावरून जळगाव जिल्ह्यात राजकीय ङ्कवारफ होत असून, भाजपकडून लोढाचे महाविकास आघाडीच्या नेत्यांसोबतचे, तर आघाडीकडून लोढाने भाजप नेत्यांबरोबर काढलेले फोटो व्हायरल केले जात आहेत. जामनेर येथील प्रफुल्ल लोढावर अंधेरी एमआयडीसी व साकीनाका पोलिस ठाण्यात पोक्सो, बलात्कार आणि हनीट्रॅपचा गुन्हा दाखल झाला आहे. यापूर्वी प्रफुल्ल लोढावर साकीनाका पोलिस ठाण्यातही पोक्सोसह खंडणीचा गुन्हा दाखल झाला होता. साकीनाका पोलिसांकडून लोढा याला ५ जुलै रोजी चकाला येथून अटक केली होती. जळगाव जिल्ह्यातील जामनेर व पहूर येथील त्याचे घर व व्यापारी संकुलात झडती घेण्यात आली. तेथून इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे त्यात लॅपटॉप, पेनड्राइव्ह, कुटुंबीयांचे मोबाइल फोन पोलिस पथकाने जप्त केले. लोढा गिरीश महाजन यांचा समर्थक असल्याचा आरोप एकनाथ खडसे यांनी केला.भाजपकडून प्रफुल्ल लोढा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असताना महाविकास आघाडीच्या नेत्यांसोबतचे त्याचे फोटो व्हायरल केले जात आहेत. तसेच आमदार एकनाथ खडसे भाजपमधून काँग्रेसमध्ये आल्यानंतर लोढा यांनी पत्रकार परिषद घेऊन खडसेंवर केलेल्या गंभीर आरोपांचा व्हिडिओदेखील समाजमाध्यमांवर व्हायरल केला जात आहे.राज्यातील काही मंत्री व अधिकारी हनीट्रॅपच्या जाळ्यात अडकले आहेत, असा गंभीर आरोप काँग्रेसने विधानसभेत केला, मुख्यमंत्र्यांनी असे काहीच घडले नाही, असे निवेदन राणा भीमदेवी थाटात केले. सवयीप्रमाणे मुख्यमंत्री धादांत खोटे बोलले. पण मुख्यमंत्र्यांच्या निकटच्या मंत्र्याबरोबर हनीट्रॅपशी संबंधित व्यक्तीचा फोटो झळकल्याने या प्रकरणातील गांभीर्य वाढले आहे. सरकार हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करत आहे. या हनीट्रॅपची उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सोमवारी मुंबईत केली.मुंबई व नाशिक जिल्ह्यात हनी ट्रॅप झाल्याच्या दाव्यांमुळे पावसाळी अधिवेशन गाजले. प्रफुल्ल लोढा यांना मुंबईतील हनी ट्रॅप च्या गुन्ह्यात अटक झाली. लोढा जळगाव जिल्ह्यातील असल्याने त्याचे पडसाद जिल्ह्यात उमटत आहेत.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

विश्वासार्ह हवे, की कार्यक्षम?

सरकारी उद्योग व्यवस्था कार्यक्षम नाही, हे जेवढे खरे आहे, तेवढेच त्या विश्वासार्ह आहेत, हे खरे आहे. आणि खासगी कंपन्या जेवढ्या कार्यक्षम आहेत, तेवढ्या विश्वासार्ह नाहीत हेही खरे! खासगीकरणाचे लोण जगभर वेगाने पसरत असताना हे वेगळेपण लक्षात घेण्यासारखे आहे. खासगीकरणाचा एक टप्पा पूर्ण झाला असताना त्याच्या अपरिहार्य रेटय़ात भारत यापुढे कोणता मार्ग निवडतो, हे नजीकच्या भविष्यकाळात स्पष्ट होईल.

एलआयसीला खुल्या बाजारात उतरवण्याचा निर्णय अखेर सरकारने घेतला. हा सर्वार्थाने मोठाच निर्णय आहे. आता सर्व तयारी झाली की, एलआयसीचा आयपीओ बाजारात येणार आणि अर्थातच त्याला मोठा प्रतिसाद मिळणार. त्यामुळे तो आपल्या देशातला सर्वात मोठा आयपीओ असणार, असे अंदाज व्यक्त केले जात आहेत आणि ते बरोबरच आहे. कारण, एलआयसी जे कमावते आहे, त्याचा आपणही हिस्सा व्हावे, असे सर्वच गुंतवणूकदारांना वाटणार. या निमित्ताने आथक क्षेत्रात किती मोठे बदल होत आहेत, याकडे लक्ष असले पाहिजे. सरकारी कंपनी असलेल्या ङ्गआयआरसीटीसीफ्च्या आयपीओला भरभरून म्हणजे अगदी ११२ पट प्रतिसाद मिळाला. आयपीओच्या मार्गाने हा शेअर ३२० रुपयांना देण्यात आला आणि शेअर बाजारात दुप्पट किमतीला लिस्ट झाला! सध्या तो शेअर १५०० रुपये इतका वाढला आहे. म्हणजे चार महिन्यांत पाचपट! दिल्ली-लखनौ तेजस एक्स्प्रेस ङ्गआयआरसीटीसीफ चालवते आहे. त्यात दिल्ली-अहमदाबाद तेजस एक्स्प्रेसची भर पडली आहे. २० फेब्रुवारीला वाराणसी-इंदूर मार्गावर अशी गाडी आठवडय़ातून तीन वेळा सुरू होते आहे. शिवाय, अशा आणखी १०० गाडय़ा सुरू होणार असल्याचे सुतोवाच अर्थसंकल्पात करण्यात आले आहे. ङ्गआयआरसीटीसीफ आता केवळ डिजिटल आरक्षण करणारी कंपनी राहिलेली नाही. ती रेल्वेत पाणी विकते, खानपान सेवा देते आणि त्यातूनही पैसा कमावते. तुम्ही अलीकडे एखाद्या लांब पल्ल्याच्या गाडीने प्रवास केला असल्यास, ङ्गआयआरसीटीसीफ्चा लोगो असलेला ड्रेस घातलेले सेवक दिसू लागले आहेत.

चांगल्या खासगी कंपन्यांना प्रतिसाद मिळत नसताना सरकारी कंपनीच्या आयपीओला मिळालेला हा प्रतिसाद अचंबित करणारा आहे. अर्थव्यवस्थेमध्ये एकाच वेळी किती परस्परविरोधी गोष्टी चालू असतात, याची अनेक उदाहरणे सध्या पाहायला मिळत आहेत. एकीकडे मंदीची चर्चा सुरू असतानाच चालू वर्षात आतापर्यंत ११ कंपन्यांनी बाजारात उतरून भांडवल जमवण्याचे धाडस दाखवत दहा हजार कोटी रुपये जमा केले आहेत. अर्थात, २०१८ या वर्षात तब्बल २४ कंपन्यांनी तीस हजार कोटी रुपये भांडवली बाजारातून उभे केले होते. त्या तुलनेत हे कमी असले तरी अशा वातावरणात गुंतवणूक करणारी मंडळी आहेत, हे लक्षात घ्यायला हवे. शेअर बाजार हा देशाच्या आथक स्थितीचा निदर्शक होऊ शकत नाही, हे खरे असले तरी अर्थव्यवस्था संघटित होत असल्याने तो निकष अधिक परिणामकारक होत चालला आहे, हे नाकारता येणार नाही.

भारताच्या सुस्तावलेल्या अर्थव्यवस्थेत जागतिक घडामोडींचा परिणाम वाढत चालला आहे. कारण, जागतिकीकरणाच्या २७ वर्षामध्ये भारताला जगाशी जोडण्याचे काम वेगाने झाले आहे. त्याचे चांगले-वाईट परिणाम आता अपरिहार्य आहेत. जागतिक घडामोडींवर भारताचे नियंत्रण नाही. त्यामुळे सरकार अर्थव्यवस्था सुधारावी यासाठी काही प्रयत्न करत आहे. त्याचाच भाग म्हणजे उद्योगांना देण्यात येणा-या सवलती, शेतकरी, कामगार आणि दारिद्र्यरेषेखालील नागरिकांना मदत. त्यामुळे साहजिकच सरकारी तिजोरीवर ताण आला आहे. तो कमी करण्यासाठी सरकारी उद्योगांचे अंशत: खासगीकरण करून महसूल उभा करण्याचा पर्याय सरकारसमोर आहे आणि त्याची जोरदार तयारी सध्या सुरू आहे. आयआरसीटीसीचा आयपीओ ही त्याची सुरुवात ठरली आहे.

कोणत्याही खेळामध्ये सुरुवातीला जास्त गुण मिळवण्यासाठी चांगल्या खेळाडूला पाठवतात. तसे या फायद्यातील कंपनीला सरकारने आधी मैदानात उतरवले आहे. अशा सार्वजनिक कंपन्यांची रांगच लागली असून गुंतवणूकदारांसाठी ती एक संधी ठरणार आहे. सरकारला भरभक्कम लाभांश देणा-या एलआयसीमध्ये तसे खासगीकरण होण्याची तूर्तास तरी शक्यता नाही, असे वाटत होते. पण, तोटय़ातल्या अनेक कंपन्या सांभाळणे सरकारला जड झाले असताना त्यांच्या खासगीकरणाला प्रतिसाद मिळण्याची शक्यता नसल्याने एलआयसीच्या खासगीकरणाचा निर्णय घेतला गेलेला दिसतो. तोटय़ातील सरकारी कंपन्यांचे प्रशासन अधिक कार्यक्षम करण्यासाठी खासगीकरणाशिवाय दुसरा मार्ग नाही. भारतीय करदात्यांचे कोटय़वधी रुपये अशा तोटय़ातील उद्योगांवर खर्च करण्याला काही मर्यादा निश्चितच आहेत. त्यामुळे सरकारने त्यातून बाहेर पडावे आणि त्यात अडकलेला पैसा अर्थव्यवस्था हलती ठेवण्यासाठी वापरावा, यासाठीचा दबाव वाढत चालला आहे.

एखाद्या उद्योगात मोनोपॉली असेल आणि किमान कार्यक्षमता असेल, तर काय होऊ शकते, याचे एलआयसी हे एक उदाहरण आहे. ही सरकारी कंपनी सध्या तब्बल ३१ लाख कोटी रुपयांचे व्यवस्थापन करत आहे. याचा अर्थ सरकारच्या या वर्षीच्या एकूण वार्षकि महसुलापेक्षा किमान पाच लाख कोटी अधिक! विमा उद्योगाचे खासगीकरण झाले आणि काही तगडय़ा खासगी कंपन्या या उद्योगात उतरल्या. भारतात विमा काढणा-यांची संख्या अजूनही खूप कमी आहे, याचा अर्थ या उद्योगाच्या वाढीला प्रचंड वाव आहे. त्याचाच परिणाम म्हणजे, इतर सर्व क्षेत्रांमधली उलाढाल कमी होत असताना विमा क्षेत्रात ती प्रचंड वाढत चालली आहे. शेअर बाजारात विमा कंपन्या जोरात असण्याचे तेच खरे कारण आहे. अर्थात, एलआयसीने खासगीकरणाला यशस्वीपणे तोंड दिले आहे. त्यामुळेच एवढय़ा स्पर्धेतही जीवन विम्यात एलआयसीचा ६९.३६ टक्के वाटा सध्या टिकून आहे. विमा उद्योगाच्या खासगीकरणानंतर एवढा अधिक हिस्सा सरकारी कंपनीकडे टिकून राहिलेला भारत हा एकमेव देश आहे. एकेकाळी साम्यवादाचा जप करणा-या चीनलाही ते शक्य झालेले नाही.

भारतीय ग्राहकांनी साथ सोडू नये म्हणून एलआयसीला आपल्या कारभारात अनेक बदल करावे लागत आहेत. कारण, चांगली सेवा, परतावा आणि खात्री दिल्याशिवाय ग्राहक विमा काढणार नाहीत. त्यामुळेच ज्या शेअर बाजाराचा आणि भारतीय नागरिकांचा अजिबात संबंध नाही, असे आपण म्हणतो, पण जेव्हा तो एलआयसीची पॉलिसी काढतो, तेव्हा शेअर बाजाराशी आपोआपच जोडला जातो. कोटय़वधी विमाधारकांना परतावा द्यायचा असल्याने एलआयसी चोखाळत असलेल्या गुंतवणुकीच्या अनेक मार्गामध्ये शेअर बाजारातील गुंतवणूक ही प्रमुख आहे. गेल्या वर्षी एलआयसीने शेअर बाजारातून २३ हजार कोटी रुपये नफा कमावला होता, तर या वर्षी आतापर्यंत ११ हजार ५०० कोटी नफा कमावला आहे. एलआयसी भारतीय शेअर बाजारात सर्वात मोठी गुंतवणूक असणारी कंपनी आहे. त्यामुळेच एलआयसीने आपल्या पोर्टफोलिओमध्ये कोणते शेअर ठेवले किंवा विकले आहेत, हा शेअर बाजारात नेहमी कुतूहलाचा विषय असतो.

भारतीय शेअर बाजार सावरण्यासाठी, सरकारची महसुली तूट भरून काढण्यासाठी, एखाद्या सार्वजनिक उद्योगाच्या आयपीओला प्रतिसाद देण्यासाठी आणि अशा अनेक आथक पेचप्रसंगात सरकार एलआयसीकडील निधीची मदत घेते आणि त्यामुळे विमाधारकांना कमी परतावा मिळतो, हा एलआयसीवर मोठा आक्षेप आहे. तोटय़ात असलेल्या आयबीडीआय बँकेची अशात घेतलेली मालकी, हे त्याचेच एक उदाहरण. पण, एवढे सगळे असूनही विमाधारकांचा एलआयसीवर विश्वास कायम आहे, याचे मर्म समजून घेतले पाहिजे. त्याचे कारण म्हणजे सध्या आर्थिक क्षेत्रात असलेले चढ-उतार भारतीय नागरिकांना लगेच झेपणारे नाहीत. आपल्याला खूप अधिक परतावा मिळणार नाही, पण आपले मुद्दल सुरक्षित राहील आणि जीवन विमाही पाठीशी राहील, अशी बहुतेक भारतीय नागरिकांची धारणा आहे. शेअर बाजारात थेट किंवा म्युच्युअल फंडांच्या मार्गाने अधिक गुंतवणूक केली पाहिजे, हे खरे असले तरी त्यावर भारतीय गुंतवणूकदारांचा विश्वास नाही. याचा दुसरा अर्थ असा की, ज्या सरकारी व्यवस्थेला आपण उठता बसता दूषणे देतो, तिच्यावर आपला पूर्ण विश्वास आहे. पोस्टात अजूनही केली जाणारी गुंतवणूक, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये असलेल्या कोटय़वधी रुपयांच्या ठेवी आणि सरकारी रोख्यांना मिळणारा प्रतिसाद ही त्याची उदाहरणे आहेत.

खासगीकरणाचे लोण जगभर आणि भारतात वेगाने पसरत असताना हे वेगळेपण लक्षात घेण्यासारखे आहे. सरकारी उद्योग, व्यवस्था कार्यक्षम नाहीत, हे जेवढे खरे आहे, तेवढेच त्या विश्वासार्ह आहेत आणि खासगी कंपन्या जेवढय़ा कार्यक्षम आहेत, तेवढय़ा त्या विश्वासार्ह नाहीत, हेही खरे! आपल्याकडे रिझर्व्ह बँकेवर सरकारचे संपूर्ण नियंत्रण आहे, तर भांडवलशाहीच्या पुरस्कर्त्या असलेल्या अमेरिकेत केंद्रीय बँकही खासगी आहे.

शहरी माओवादी पुन्हा सक्रिय; कोलकाता, बेंगळुरुत अड्डे असल्याचा मुख्यमंत्र्यांचा दावा...

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना शरद पवार यांनी त्यांच्या कार्यशैलीचे कौतुक केले. फडणवीस यांच्या अथक परिश्रमाचे वर्णन अभूतपूर्व असे करताना पवार म्हणाले, ङ्गमी त्यांचे कार्य पाहतो आणि विचार करतो की, ते थकत का नाहीत?फ ते आणि फडणवीस यांच्या कार्यशैलीत एक अद्भुत ताळमेळ असल्याचे पवार म्हणाले. दोन विरुद्ध विचारसरणीचे लोक एकत्र काम करू शकतात हे फडणवीस यांनी दाखवून दिले आहे, असेही पवार यांनी म्हटले आहे.ङ्गगडचिरोलीचा विकास होत असल्याचे दिसताच आदिवासींच्या जमिनी हिसकावण्यात आल्या, त्यांना मारून टाकले, त्यांच्या जमिनीवर उद्योग उभारले, जंगलाची कत्तल केली, असा अपप्रचार सुरू झाला. हा अपप्रचार नेमका सुरू कुठून आहे, याचा पोलिसांनी शोध घेतला असता कोलकाता आणि बेंगळुरू येथून हा प्रकार सुरू असल्याचे आढळले. विदेशी निधी घेऊन ते काम करीत होते. जंगलातील बंदुकीची लढाई संपण्याच्या मार्गावर असल्याने हे शहरी माओवादी सक्रिय झाले आहेत. त्यांच्यापासून सजग राहावे लागणार आहेफ, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी केले.कोनसरी येथील लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडच्या एकात्मिक पोलाद प्रकल्पाचे भूमिपूजन मंगळवारी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. गडचिरोली हा राज्यातील पहिल्या क्रमांकाचा जिल्हा बनविल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.मुख्यमंत्री म्हणाले, ङ्गगडचिरोली हा सर्वाधिक हिरवळ असलेला जिल्हा आहे. या भागात उद्योग सुरू करताना ही हिरवळ वाढवायला हवी. म्हणूनच गडचिरोलीत एक कोटी वृक्ष लागवड केली जाणार आहे. आज यातील ४० लाख झाडे लावण्याचा शुभारंभ करीत आहोत. यातील ८० टक्के झाडे जगलेली असतील.जल-जंगल-जमीनचा विनाश न करता गडचिरोलीचा विकास करायचा आहे. कुठल्याही प्रकारचे प्रदूषण होणार नाही, असा प्रयत्न आहे. ८० किलोमीटर लांबीची स्लरी पाइपलाइन प्रदूषण टाळण्यास मदत करेल. कार्बन उत्सर्जनात सुमारे ५५ टक्के घट होईल. राज्यातील पहिली आणि देशातील चौथी अशी ही स्लरी पाइपलाइन असेल.फ भविष्यात ई-व्हेइकल आणि गॅसवर चालणाऱ्या वाहनांद्वारे ङ्गग्रीन ट्रान्सपोर्टेशनफवर भर देऊन प्रदूषणमुक्त विकासाची ग्वाहीदेखील फडणवीस यांनी दिली.गडचिरोली हा माओवादग्रस्त जिल्हा सरकारी भाषेत ङ्गपनिशमेंटचा जिल्हाफ म्हणून ओळखला जात होता. आता परिस्थिती बदलली आहे. या जिल्ह्यात अधिकारी नियुक्ती मागत आहेत. इथल्या नागरिकांनी माओवादाची साथ सोडून संविधानावर चालणाऱ्या व्यवस्थेसोबत असल्याचे दाखवून दिले आहे. हा बदल लहान नाही. आज गडचिरोलीचे दरडोई उत्पन्न राज्यात सर्वांत कमी आहे. पुढच्या पाच वर्षांत गडचिरोली पहिल्या दहा जिल्ह्यांमध्ये स्थान नक्कीच मिळवेलफ, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. मंगळवारी मुख्यमंत्र्यांचा वाढदिवस होता. यानिमित्त त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. वाढदिवशी गडचिरोलीतील विकास प्रकल्पांचे उद्घाटन करीत या जिल्ह्याकडे त्यांचे विशेष लक्ष असल्याची चर्चा यानिमित्ताने होत आहे.

रिसेप्शनिस्ट मराठी तरुणीला मारहाण करणाऱ्या आरोपीला अटक...

ठाणे : कल्याणमध्ये एका परप्रांतीय तरुणाने खाजगी रुग्णालयात काम करणाऱ्या रिसेप्शनिस्ट तरुणीला अमानुष मारहाण केली आहे. या घटनेचा सीसीटीव्ही फुटेज समोर आल्यानंतर नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. मनसेनेही या घटनेचा तीव्र निषेध केला करत आक्रमक पवित्रा घेतला. याप्रकरणी आता मोठी बातमी समोर येत आहे. मारहाण करणारा तरुण गोपाल झा ला अटक करण्यात आली आहे. मनसेच्या पदाधिकाऱ्यानेच त्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. तर या प्रकरणाबद्दल पीडितेशी महिला पोलीस अधिकाऱ्यांकडून बंद दाराआड नव्याने चौकशी करण्यात येत आहे. आरोपी गोकुळ झा सह चार जणांना पोलिसांनी याप्रकरणी अटक केली आहे. गोकुळचा भाऊ रणजीत झा ला सुद्धा ताब्यात घेण्यात आले आहे. मारहाण करणार हा रेकॉर्डवरचा आरोपी असल्याची धक्कादायक माहिती पोलिसांनी दिली आहे. मनसेचे पदाधिकारी योगेश गव्हाणे यांनी या फरार आरोपीला पकडले आणि पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.या घटनेचा संतापजनक व्हिडिओ समोर आला आहे. क्लिनिकच्या सीसीटिव्ही मध्ये ही घटना कैद झाली. आरोपी तरुणाने किती अमानुषपणे तरुणीला मारहाण केली हे दिसत आहे. या घटनेमुळे मनसेने आक्रमक पवित्रा घेतला आहे. मनसे नेते अविनाश जाधव यांनी पीडित तरुणीची भेट घेत तिची विचारपूस केली. यावेळी तिला शब्द दिला की, आम्ही तुला झालेल्या मारहाणीचा बदला घेतल्याशिवाय राहणार नाही. ताई तुला आज सांगतो. आम्ही तुझा बदला घेणार. ज्या हातांनी तुला मारलं त्याच हातांचा आम्ही बंदोबस्त करणार, असे अविनाश जाधव म्हणाले. नागरिकांमध्ये या घटनेनंतर संताप आहे. आरोपीला लवकरात लवकर अटक करण्याची मागणी झाली. पोलिसांनी फरार आरोपीचा शोध घेऊन त्याला बेड्या ठोकल्या आहेत.दरम्यान, पीडितेने एका

वृत्त वाहिनीला या घटनेसंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे. ती घटना सांगितली, त्यावेळी तिला अश्रू अनावर झाले. हे दृश्य काळजात धस्स करणारे आहेत. पीडिता म्हणाली, त्या व्यक्तीने मला शिवीगाळ केली. मी फक्त एवढंच बोलली की, सर तुमचा नंबर नाही. नंबर येण्यास अजून वेळ आहे. नंबर आली की मी तुम्हाला आतमध्ये पाठवेन. यात माझी काय चूक आहे? माझी काही चूक नसताना त्याने मला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. त्यानंतर त्याने मला प्रचंड अमानुष मारहाण केली. माझे केस ओढून मला बाहेर दरवाजापर्यंत नेलं. मला लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. त्याच्या पायाचे निशाणा माझ्या टीशर्टवर आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

गोंधळात गोंधळ

वेगवेगळ्या उच्च न्यायालयांनी पदोन्नतीतल्या आरक्षणाबाबत व्यक्त केलेली मतं आणि सर्वोच्च न्यायालयानंही सुनावणीच्या वेळेला व्यक्त केलेली मतं यामुळे सामान्यांचा गोंधळ उडतो. कायद्याच्या क्षेत्रात काम करणा-यांचीही अर्थ लावताना तारांबळ उडते. अनुसूचित जाती-जमाती कायद्याचा दुरुपयोग होतो, असं मत व्यक्त करणा-या सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच या विषयावर नव्याने मतप्रदर्शन केलं. त्यानिमित्ताने घेतलेला या बहुचर्चित विषयाचा वेध.

भारतात सामाजिक विषमता भरपूर आहे. मागच्याच महिन्यात आलेल्या एका अहवालात पाकिस्तान, बांगलादेश आणि श्रीलंकेपेक्षाही भारतातली आर्थिक विषमतेची दरी मोठी असल्याचं उघडं झालं होतं. ही आताची स्थिती आहे. ऐंशी वर्षांपूर्वीच्या सामाजिक उतरंडीचा विचार केला, तर आरक्षणाची गरज का होती, हे पटू शकतं. आरक्षण ठरावीक काळापुरतं होतं, असा एक बचाव केला जातो; परंतु आताही संसदेत आर्थिक पाहणी अहवाल येतात आणि त्यातल्या अनुसूचित जाती-जमाती तसंच भटक्यांच्या आर्थिक स्थितीचा विचार केला, तर आरक्षणाची आवश्यकता का आहे, हे दिसून येतं. अर्थात त्याबाबत दुमतही असू शकतं. राज्यघटनेनं आरक्षण दिलं असेल, तर त्याचं रक्षण करण्याची जबाबदारी अपरिहार्यपणे न्यायालयांवर येते. भारतात अठरापगड जाती आहेत. त्यांच्यातल्या शिक्षणाचं प्रमाण कमी-जास्त आहे. वर्षानुवर्ष शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेल्यांना प्रवाहात आणण्यासाठी, त्यांचं सामाजिक स्थान उंचवावं, म्हणून शिक्षणात, नोक-यांमध्ये आरक्षणाची तरतूद करण्यात आली. नोक-यांमधली आरक्षणाची तरतूद पदोन्नतीत असावी की असू नये, यावर वाद आहेत. ज्येष्ठतेनुसार पदोन्नती दिली जावी, तिथे आरक्षणाचा संबंध असू नये, यावरही भरपूर खल झाला; परंतु कधी कधी उच्चवर्णीय आकसापोटी मागास अधिका-यांचा गोपनीय अहवाल लिहिताना प्रतिकूल शेरे मारतात. त्यामुळे पदोन्नती रखडण्याची शक्यता असते. त्यामुळे अनेक राज्यांमध्ये पदोन्नत्यांमध्येही आरक्षण ठेवलं होतं.

सर्वोच्च न्यायालयात या विषयावर अनेक याचिका दाखल झाल्या होत्या. गेल्या दोन वर्षांमध्ये त्यावर वेगवेगळ्या सुनावण्या घेण्यात आल्या. अंतिम निकाल येईपर्यंत पदोन्नतीत आरक्षण रद्द करता येणार नाही, असे आदेश न्यायालयानं दिले होते. बढत्यांमधल्या आरक्षणाचा निर्णय केंद्र सरकारनेही राज्यांवर सोपवला होता. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच या संदर्भात दिलेल्या निकालाकडे पाहावं लागेल. सरकारी नोकरीमध्ये आरक्षणाचा दावा करणं हा मूलभूत अधिकार नाही आणि कोणतंही न्यायालय राज्य सरकारला अनुसूचित जाती-जमातीच्या समुदायाला आरक्षण देण्याचे आदेश देऊ शकत नाही, असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. हा आदेश गोंधळ निर्माण करणारा आहे. आरक्षण हा मूलभूत अधिकार नसेल, तर राज्य सरकारांनी त्यासंदर्भातल्या नियमांचं उल्लंघन केलं, तर कुणाकडे दाद मागायची आणि आरक्षणाचा ठरवून दिलेला कोटा न भरताच सरकारी नोकरभरती करणा-यांना जाब कसा विचारायचा, असा प्रश्न पडू शकतो. आरक्षणाबद्दलचा निर्णय राज्य सरकारांच्या विवेकावर अवलंबून आहे. बढतीमध्ये आरक्षण द्यावं की नाही, हे त्या-त्या सरकारनं ठरवायचं आहे. बढतीमध्ये आरक्षण देणं हे राज्य सरकारवर बंधनकारक नाही, असंही न्यायालयानं म्हटलं आहे. राज्य सरकारला आरक्षण द्यायचं असेल, तर सरकारी नोकरीमध्ये अनुसूचित जाती-जमातींचं प्रतिनिधित्व किती आहे, याबद्दलची माहिती गोळा करायला हवी, हे न्यायालयाचं म्हणणं रास्त आहे; परंतु पूर्वीच्या एका प्रकरणात न्यायालयानं माहिती गोळा करण्याची गरज नाही, असं म्हटलं होतं.

राज्य सरकार आरक्षण देण्यासाठी बांधिल नाही. बढतीमध्ये आरक्षण हा व्यक्तीचा मूलभूत अधिकार नाही, असं न्या. एल. नागेश्वर राव आणि हेमंत गुप्ता यांच्या खंडपीठानं अलीकडे म्हटलं आहे. त्यामुळेच राज्य सरकारला न्यायालय कोणताही आदेश देऊ शकत नाही, हेही त्यांनी स्पष्ट केलं. राज्य सरकारनं यावर विवेकाचा उपयोग करून आरक्षणाच्या तरतुदी ठरवाव्यात, पण त्याला अचूक आकडेवारीची जोड हवी, अशी पुष्टीही न्यायालयानं जोडली आहे. उत्तराखंडच्या सार्वजनिक बांधकाम विभागात सहाय्यक अभियंत्याच्या पदांच्या बढतीसंदर्भातल्या सुनावणीच्या वेळी न्यायालयानं हा निर्णय दिला. या प्रकरणी उत्तराखंड सरकारनं आरक्षण न देण्याचा निर्णय घेतला होता, पण उच्च न्यायालयानं राज्य सरकारला अनुसूचित जाती, जमातीच्या प्रतिनिधित्वाबद्दल माहिती गोळा करण्याचे आदेश दिले होते. सहाय्यक अभियंत्याच्या पदांवर केल्या जाणा-या नियुक्तीमध्ये फक्त अनुसूचित जाती-जमातींचे प्रतिनिधी हवेत, असंही उच्च न्यायालयानं म्हटलं होतं. सर्वोच्च न्यायालयानं उच्च न्यायालयाचे आदेश रद्द ठरवले आहेत. सरकार बढतीत आरक्षण लागू करू शकतं, असं मागे सर्वोच्च न्यायालयानंच म्हटलं होतं. त्यामुळे बढतीपासून वंचित राहिलेल्या कर्मचारी-अधिका-यांना दिलासा मिळाला होता. आताचा निर्णय पूर्वीच्या निर्णयाला छेद देणारा आहे. कर्मचा-यांना बढती देणं ही सरकारची जबाबदारी आहे; मात्र विविध उच्च न्यायालयांच्या निर्णयांमुळे कर्मचा-यांची बढती थांबली असल्याचा मुद्दा केंद्र सरकारनं उपस्थित केला.

बढतीतल्या आरक्षणाबाबत अंतिम निकाल येईपर्यंत केंद्र सरकार प्रचलित कायद्यांनुसार अनुसूचित जाती-जमातीच्या प्रवर्गातल्या कर्मचा-यांना आरक्षणानुसार बढती देऊ शकतं, असंही न्यायालयाने म्हटलं होतं. नोकरीतल्या बढतीमध्ये आरक्षण लागू करण्याच्या मुद्यावर न्यायालयांच्या आदेशानुसार अनेक सरकारी विभागांमध्ये कर्मचा-यांना बढती मिळत नव्हती. त्यामुळे कर्मचा-यांमध्ये अस्वस्थता होती. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतल्या (एससी/एसटी) उमेदवारांना बढतीत आरक्षण देणं योग्य आहे किंवा अयोग्य आहे, यावर आम्हाला कोणतीही टिप्पणी करायची नाही, मात्र हा वर्ग एक हजार वर्षांपासून मागास आहे, यातना झेलत आहे, आजही त्याच्यावर अत्याचार होत आहेत, अशा शब्दांमध्ये केंद्र सरकारनं आपली भूमिका स्पष्ट केली होती. असं असताना सर्वोच्च न्यायालयानं मूलभूत अधिकाराचा मुद्दा मांडून ङ्गहा अधिकार नाहीफ असं म्हटल्याने नवे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

२००६मध्ये न्या. नागराज यांनी दिलेल्या निकालामुळे अनुसूचित जाती-जमातीच्या बढतीतलं आरक्षण थांबलं आहे. २००६ मधील निकालावर तातडीनं पुनर्विचार होण्याची गरज आहे. अनुसूचित जाती-जमाती मुळातच मागास असल्यानं बढतीत आरक्षण देण्यासाठी कोणताही वेगळा पुरावा देण्याची गरज नाही. अनुसूचित जाती-जमातीच्या आधारावरच नोकरी मिळाली असल्यानं पदोन्नतीतल्या आरक्षणासाठी पुन्हा पुरावा देण्याची गरज काय, असा प्रश्नही उपस्थित झाला होता. बढती देण्याआधी संबंधिताची सामाजिक, आथक स्थिती पाहणं चुकीचं आहे का, तो मागासलेपणाचे चटके सोसतोय की नाही, हे पाहायला नको का, अशी विचारणा न्यायालयानं केली होती. सरकारी नोकरीत बढती मिळणं ही संवैधानिक गरज आहे,

सुंदर त्वचेसाठी भरपूर पाणी प्या

त्वचेचा रंग कोणताही असू दे, पण जर ती निरोगी नसेल तर जगभरातील कोणतंही सौंदर्यप्रसाधन वापरून तुम्ही चांगले दिसणार नाही. म्हणून भरपूर पाणी प्या.आरोग्यदायी आहाराचं सेवन करा, स्वच्छतेकडे लक्ष द्या. सुंदर, नितळ आणि चमकदार त्वचा ठेवण्यासाठी हे करून बघा, फरक दिसेल.तज्ज्ञांच्या मते, त्वचा निरोगी दिसण्यासाठी केवळ सौंदर्यप्रसाधनं पुरेशी नसतात, तर पाणी सगळ्यात महत्त्वाचं आहे. जोपर्यंत त्वचा हायड्रेटेड होणार नाही, तोपर्यंत त्वचेमध्ये चमक येणं शक्य नाही.

त्वचेला हायड्रेट ठेवणं केवळ त्वचेच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे, असं नाही तर शरीराच्या आरोग्यासाठीही गरजेचं आहे. आपल्या शरीरात ७० टक्के पाणी आहे. म्हणून आपण भरपूर प्रमाणात पाणी पिणं खूप आवश्यक आहे. त्वचेसाठी पाणी अधिक महत्त्वाचं ठरतं कारण घामाच्या रूपात आपल्या शरीरातील विषाक्त पदार्थ बाहेर काढण्याचं काम आपली त्वचा करते. हे तेव्हाच शक्य होईल, जेव्हा त्वचेमध्ये भरपूर ओलावा असेल.

लोणार व शेगाव तालुक्यात ढगफुटीने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून भरपाई द्या-रविकांत तुपकर

जनसंचलन/ देऊळगाव राजा

जिल्ह्यातील लोणार व शेगाव या दोन तालुक्यांमध्ये पावसाने कहर केला आहे. या ढगफुटीमुळे शेतीचे आणि पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. घरांचेही नुकसान झाले आहे,सदर नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना शंभर टक्के नुकसान भरपाई विनाअट द्यावी अशी मागणी युवा नेते रविकांत तुपकर यांनी केली आहे या संदर्भात आज २२ जुलै रोजी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.तर दुसरीकडे क्रांतिकारी चे नेते सहदेव लाड व इतर पदाधिकाऱ्यांनी शेतावर जाऊन पाहणी केली व नुकसान ग्रस्ताना धिर दिला. जिल्ह्यात एकीकडे अद्यापही जोरदार पावसाची प्रतिक्षा आहे तर दुसरीकडे काही भागात मुसळधार पावसाने, ढगफुटीने थैमान घातले आहे. २१ जुलै च्या रात्री व २२ जुलै च्या सकाळी लोणार व शेगाव तालुक्यात ढगफुटी सदृष पाऊस झाला. नदी-नाले आपले पात्र सोडून वाहू लागले. या अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणच्या शेतजमिनी खरडून गेल्या. काही शेतांमधील पिके वाहून गेली तर काही शेतांना तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.घरांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.या अधिवृष्टीमुळे लोणार तालुक्यातील आरडव,वढव, हिरडव, गुंधा, गुंजखेड, चिंचोली सांगळे, पारडा दराडे, देऊळगाव कुंडपाळ, पांगरा डोळे, टिटवी, नांद्रा तसेच शेगाव तालुक्यातील नागझरी टाकळी, तिंत्रव, जवळा वरखेड, हिंगणा हुई यासह इतर गावांमध्ये शेतीचे आणि पिकांचे प्रचंड असे नुकसान झाले आहे त्यामुळे काही ठिकाणी दुबार पेरणीचे संकट आहे तर काही ठिकाणी दुबार पेरणी देखील करण्यायोग्य जमीन राहिली नाही, त्यामुळे या दोन तालुक्यातील शेतकरी प्रचंड अडचणीत सापडले आहेत. आधीच शेतकऱ्यांनी सावकाराकडून कर्ज काढून पेरणी केली होती त्यात आता पुन्हा अतिवृष्टीचे संकट ओढवले आहे.यामुळे शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर उभे ठाकले आहेत. अशावेळी शेतकऱ्यांना तातडीने आधार देण्याची नितांत गरज आहे. त्यामुळे प्रशासनाच्या वतीने तातडीने सर्व नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना शंभर टक्के विनाअट नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत शासनाकडे केली आहे. दरम्यान क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी सहदेव लाड व इतर कार्यकर्त्यांनी लोणार तालुक्यातील अतिवृष्टभागाची पाहणी करून रविकांत तुपकर यांच्याकडे आढावा मांडला

बुलढाणा आदिवासी मुलींच्या शासकीय वसतीगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू...

जनसंचलन/बुलढाणा

येथील आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृहात शैक्षणिक सत्र २०२५-२६ करिता अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थिनींसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इयत्ता ११ वी व त्यापुढील शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींना वसतीगृहात प्रवेश दिला जाणार आहे. वसतीगृहात निवासासोबतच शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत विद्यार्थीनींच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट डीबीटी (Direct Benefit Transfer)) प्रणालीद्वारे विविध प्रकारचे शैक्षणिक भत्ते प्रदान केले जातात. यामध्ये निर्वाह भत्ता, भोजन भत्ता, स्टेशनरी भत्ता, ड्रेस कोड भत्ता, शैक्षणिक सहल भत्ता तसेच अभ्यासक्रमानुसार इतर शैक्षणिक भत्त्यांचा समावेश आहे. आवश्यक कागदपत्रे: अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र व जाती वैधता प्रमाणपत्र (व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी), शाळा सोडल्याचा दाखला, इयत्ता १० वीची गुणपत्रिका, बुलढाणा शहरातील कनिष्ठ/वरिष्ठ महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र, फिटनेस मेडिकल सर्टीफिकेट, उत्पन्नाचा दाखला (सन २०२४-२५), आधार कार्ड, आधार संलग्न बँक खाते पासबुक किंवा पोस्ट बँक पासबुक झेरॉक्स, रहिवासी दाखला, पासपोर्ट साईझ फोटो. अर्जामध्ये विद्यार्थिनीने स्वतः चा किंवा पालकांचा मोबाईल नंबर नमूद करावा, जो आधार आणि बँक खात्यासोबत लिंक असावा. अर्ज भरताना नाव आधार कार्डवरील नावाशी जुळणारे असणे आवश्यक आहे. बँक खाते सुरु असल्याची खात्री विद्यार्थिनीने स्वतः बँकेत जाऊन करून घ्यावी. सर्व आवश्यक कागदपत्रांची झेरॉक्स प्रत ऑनलाईन अर्जासोबत अपलोड करणे अनिवार्य आहे. इच्छुक विद्यार्थिनींनी https://swayam.mahaonline.gov.inया संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरावा. अर्ज भरल्यानंतर त्याची प्रिंट (हार्डकॉपी) आवश्यक कागदपत्रांसह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष जमा करावी. अधिक माहितीसाठी आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह,राऊत मंगल कार्यालय, सर्व्हयुलर रोड, जिजामाता महाविद्यालयाजवळ, बुलढाणा येथे संपर्क साधावा, असे आवाहन शासकीय आदिवासी मुलींचे वसतीगृहाचे गृहपाल यांनी केले आहे.

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..

गुंतवणूक रक्कम		५००	१०००	१५००	२०००	३०००	५०००
अ.क्र.	गुंतवणूक कालावधी महिने	पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम					
१	१५६	१०३४१८	२०६८३६	३१०२५४	४१३६७२	६२०५०७	१०३४१७९
२	१४४	९५५४४	१९१०८८	२८६६३३	३८२१७७	५७३२६५	९५५४४२
३	१३२	८८२६९	१७६५३८	२६४८०६	३५३०७५	५२९६१३	८८२६८८
४	१२०	८१५४४	१६३०८७	२४४६३१	३२६१७५	४८९२६२	८१५४३६
५	१०८	७५३३६	१५०६७१	२२६००७	३०१३४२	४५२०१३	७५३३५५
६	९६	६५५९६	१३९१९३	२०८७८९	२७८३८६	४१७५७९	६९५९६५

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

अ.क्र.	मुदती ठेवीचे विवरण		लागू व्याजदर	पतसंस्था व इतर संस्था
१	१५ दिवस ते ९० दिवस		६.००%	६.००%
२	९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता)		६.५०%	५.००%
३	१८१ दिवस ते १३ महिने		६.००%	६.००%
४	१४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता)		७.००%	६.००%
५	आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता)		७.००%	६.००%
६	मासिक ठेव		७.००%	–
७	बचत ठेव	अ) रू. ३ लाखांपर्यंत	३.००%	–
		ब) रू. ३ लाखांचे वर	४.५०%	–

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

वय	गुंतवणूक रक्कम	मिळणारी रक्कम
जन्माच्या वेळी	१७०००	१०३६०९
१ वर्ष	१८०००	१००६५७
२ वर्ष	१९५००	१०००५२
३ वर्ष	२१५००	१०१२१७
४ वर्ष	२३५००	१०१५०९
५ वर्ष	२५५००	१०१०६४
६ वर्ष	२७५००	१००००३
७ वर्ष	३००००	१०००९७
८ वर्ष	३३०००	१०१०२७
९ वर्ष	३६०००	१०११२२
१० वर्ष	३९०००	१००५१५

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

जिल्हयातील ८ मंडळात ढगफुटीसदृश्य पाऊस नुकसानीची तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्हा प्रशासनाला दिले निर्देश

जनसंचलन/बुलडाणा

२१ जुलै रोजी बुलढाणा जिल्हयातील ८ मंडळ क्षेत्रामध्ये ढगफुटीसदृश्य पाऊस झाल्यामुळे या मंडळ क्षेत्रामध्ये घरांचे आणि शेतजमिनीचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. झालेल्या नुकसानीची तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहे. बुलढाणा जिल्हयातील लोणार तालुक्यातील २१ जुलै ला ढगफुटीसदृश्य पाऊस झाला. या पावसामुळे नदि नाले तुडूंब भरुन वाहु लागले. पावसाचे पाणी घरात शिरल्यामुळे अनेक कुटूंबांच्या घरांचे व घरातील सामानांचे नुकसान झाले आहे. तर शेतजमिनही खरडुन गेले आहे. २१ जुलै ला लोणार येथे १७१.८ मि.मि., टिटवी येथे १५४.५ मि.मि., हिरडव येथे १८४.५ मि.मि., शेगांव तालुक्यातील जवळा १७७.३ मि.मि., खामगांव तालुक्यातील पळशी येथे १५१ मि.मि. पावसाची नोंद २१ जुलै च्या मध्यरात्री झाली आहे.



भाजप कार्यकर्ते पंकज देशमुख मृत्यू प्रकरणात संशयीतांची नावे समोर!

सुनीता देशमुखांनी घेतली पोलीस अधीक्षकांची भेट!

जनसंचलन/ जळगाव जामोद

जळगाव जामोद चे भाजपा आमदार संजय कुटे यांचे निकटवर्तीय असलेले कारचालक पंकज देशमुख यांचा ३ मे रोजी संशयास्पद स्थितीत मृतदेह आढळला होता. पोलिसांनी या मृतदेहाचं मृतकाच्या नातेवाईकांना विश्वासात न घेता अकोला येथील रुग्णालयात शवविच्छेदन केलं. मात्र पंकज देशमुख यांचा मृत्यू हा आत्महत्या नसून घातपात असल्याचा संशय व्यक्त करत पंकज देशमुख यांच्या मृत्यूची सीआयडी चौकशी करण्याची मागणी पंकज देशमुख यांच्या पत्नी सुनीता देशमुख यांनी लावून धरली.दरम्यान त्यांनी संचितांची नावे समोर आणली आहेत. आज २२ जुलै रोजी सुनीता देशमुख यांनी बुलढाणा कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांची भेट घेऊन या प्रकरणातील तीन संशयतांची नावे व या प्रकरणात संशयीतांना मदत करणाऱ्या तीन पोलीस अधिकाऱ्यांची नावे पोलीस अधीक्षकांकडे दिली आहे. आज सुनीता देशमुख यांनी पहिल्यांदाच माध्यमांसमोरही पंकज देशमुख यांची हत्या करणाऱ्या संशयीतांची नावे व त्यांना मदत करणाऱ्या तीन पोलीस अधिकाऱ्यांची नावे उघड केल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. पोलीस विभागही अडचणीत आला आहे. आता पोलीस अधीक्षक यावर काय कारवाई करतात हे बघणं महत्त्वाचं असेल.आमदार संजय कुटे यांचा कारचालक व निकटवर्ती असलेल्या पंकज देशमुख यांच्या घातपातात सुनीता देशमुख यांनी आज पोलीस अधीक्षकांना दिलेली संशयीतांची नावे धक्कादायक आहे.

अशी आहेत संशयीतांची नावे!

१ - निलेश शर्मा (आ. संजय कुटे यांचे स्वीय सहाय्यक व अतिशय निकटवर्ती.) २ - गजानन सरोदे (आ. संजय कुटे यांचे निकटवर्तीय नातेवाईक.) ३ - परीक्षित ठाकरे (कंत्राटदार)४ - श्रीकांत निचळ (पोलीस निरीक्षक, जळगाव जामोद५ - अमोल पंडित (पोलीस उप निरीक्षक) ६ - सचिन राजपूत (गोपनीय विभाग कर्मचारी)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना बुलढाणा भाजपकडून ५५ रक्तदात्यांच्या जीवनदायी शुभेच्छा!

जनसंचलन/बुलढाणा

बॅनरबाजी नव्हे, रक्तदात्यांची शुभेच्छा! या अभिनव संकल्पनेतून आज दिनांक २२ जुलै २०२५ रोजी भाजप बुलढाणा शहराच्या वतीने राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. स्थळ: गर्दे वाचनालय सभागृह, बुलढाणा वेळ: सकाळी ९ ते १२ या उपक्रमात ५५ रक्तदात्यांनी रक्तदान करून मुख्यमंत्री महोदयांना जीवनदायी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे भाजपा जिल्हाध्यक्ष तथा मा. आ. विजयराज शिंदे होते,शहराध्यक्ष मा. मंदार बाहेकर यांच्या नेतृत्वात शिबिराचे आयोजन पार पडले.या शिबिराचे प्रमुख संयोजक अजित गुळवे होते. प्रत्येक रक्तदात्याला भाजपा प्रदेशाध्यक्ष मा. रविंद्र चव्हाण यांच्या स्वाक्षरीचे प्रशस्तीपत्र देण्यात आले. रक्तदान करणाऱ्यांमध्ये अनेक मान्यवरांचाही सहभाग: रक्तदात्यांमध्ये माजी जिल्हा सरकारी वकील ऍड अमोल बल्लाळ, शहराध्यक्ष मंदार बाहेकर, माजी नगरसेवक अरविंद होंडे,वैभव इंगळे, सौ सरला मंदार बाहेकर,भाजयुमो जिल्हाध्यक्ष विनायक भाग्यवंत,स्वराज विजयराज शिंदे, मुकुंद देशपांडे, निलेश मुठ्ठे, हरीनारायण गायकवाड,दत्तात्रय घायाळ, गजानन अवसरमोल, विमल बेंडवाल, रवी संगेले, अविनाश शेंडे, भगवान एकडे, अजित गुळवे,प्रतील गायकवाड, वैभव लाड, सुदर्शन कांबळे,केशव बेंडवाल,गजानन वराडे, सचिन सूर्यवंशी, ज्ञानेश्वर मांजरे, मनोज राठोड, निलेश इंगळे, अरविंद देशमुख, अमित देशमाने, धनराज राऊत, सुदेश देवकत्ती, उमेश जाधव, सागर खरात, देवेन अग्रवाल, विनायक भोयर,लोकेश अग्रवाल, केदार राजुरिया, वैभव जोशी, चैतन्य काळे ,गजानन कळमकर, गौरव वर्मा, हरीश इंगोले, शंकर शिंदे , विशाल औसलकर, निशांत पातोंड, प्रीतमसिंग राजपूत, नितेश पोलाखरे, अजय चव्हाण, रवी सोळंके, मधुकर चौधरी, आकाश इंगळे,सुमित खरे,प्रितेश बेदमूथा, प्रमोद गावंडे, अनिकेत बिबे, अमोल सोळंके, दीपक चिखले, सतीश उबाळे, विकास उबाळे, सुनील जाधव ई नी रक्तदान रुपी शुभेच्छा दिल्या. याशिवाय रक्तदान शिबिर प्रसंगी माजा जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश मांन्टे,प्रदेश प्रतिनिधी दिपकजी वारे, प्रा जगदेवराव बाहेकर, बाबा वरणगावकर, जेष्ठ विधिज्ञ श्री व्ही.डी. पाटील,राज्य परिषद सदस्य श्रीमती वैजयंतीताई कस्तुरे, मा नगरसेवक उदयजी देशपांडे, गोविंदजी सराफ,प्रदीप बेगाणी, कामगार मोर्च्या प्रदेश प्रतिनिधी अण्णासाहेब पवार,जिल्हा सचिव चंद्रकांत बर्दे, मोताळा मंडळ अध्यक्ष सचिन शेळके, डॉ मधुसुदन सावळे,राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष मंगेश बिडवे,राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष मनीष बोरकर, माजी शहराध्यक्ष अनिल बावस्कर,राष्ट्रवादी नेते सुजित देशमुख ,महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सौ स्मिताताई चेकेटकर,सौ शोभाताई ढवळे, भाजयुमो शहराध्यक्ष कुणाल अग्रवाल, भाजयुमो तालुकाध्यक्ष प्रतीक गायकवाड, सौ.उषाताई पवार, मिलिंद कुलकर्णी,

सचिन टेंभिकर, अशोक किलबिले, ऍड दसरथसिंग राजपूत, प्रदीप तोटे,नितीन दासर, अभिषेक वायकोस, शुभम कोठारी,अक्षय छाजेड अनेक जेष्ठ ,आजी,माजी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्तसंकलनाची जबाबदारी ङ्गजीवनधारा ब्लड बँकफ यांनी समर्थपणे पार पाडली. मुख्यमंत्री फडणवीस यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा करून बुलढाणा भाजपने एक चांगला आदर्श प्रस्तुत केला आहे. त्यांच्या कार्यशैलीस अनुरूप अशा उपक्रमातून भाजपने सामाजिक बांधिलकी जपल्याचे यावेळी स्पष्ट झाले

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८